Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3 ISSN No. 2456-1665

# देशातील व महाराष्ट्र राज्यातील पशुधन व त्यापासून मिळणारे उत्पादन

**डॉ. एम. पी. ढेरे**
सहाय्यक प्राध्यापक. वाणिज्य विभाग
अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना

**प्रस्तावना:-**

भारतातील बहुसंख्य लोकसंख्या ही ग्रामीण भागामध्ये राहत असून यातील बहुतांशी लोकांची उपजिविका ही शेती व्यवसायावर अवलंबून आहे. देशांमध्ये प्राचीन काळापासून शेतीची मशागत ही जनावरा मार्फत केली जात असल्याने जनावरे व शेती यांचा जुन्या काळापासूनच अतूट असा संबंध राहिलेला आहे. त्याचबरोबर जनावरापासून मिळणारे उत्पादन ज्यामध्ये दूध, अंडी, मांस इत्यादी अन्न म्हणून मानवाच्या सर्वांगीन वाढीसाठी तसेच आर्थिक उत्पन्नाचे साधन म्हणून फार पूर्वीपासून पशुधन उत्पादनांना अनन्य साधारण महत्त्व राहिलेले आहे. जागतिक पर्यावरणातील सततच्या बदलामुळे व निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती व्यवसाय हा बेभरवशाचा बनत चाललेला आहे परिणामी शेती व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या समोर सतत नवनवीन अडचणी निर्माण होत आहेत म्हणून सद्यस्थितीत देशातील शेतकऱ्यांना शेतीसोबतच पशुसंवर्धन करून त्यापासून मिळणाऱ्या उत्पादनावर आपली उपजीविका भागवणे सोयीचे ठरत आहे

देशातील पशुधनांमध्ये विशेषतः गाय व बैल, म्हशी, रेडे, शेळ्या, मेंढ्या, डुकरे, घोडे, शिंगरे, खेचरे, उंट, गाढव इत्यादीचा तर या पशुधनापासून मिळणाऱ्या उत्पादनामध्ये दूध, मांस, अंडी, लोकर इत्यादी उत्पादनांचा समावेश होतो. सद्यस्थितीत जगामध्ये दूध उत्पादनात भारताचा पहिला क्रमांक लागत असून देशांमध्ये प्रतिव्यक्ती प्रतिदिन 427 ग्रॅम एवढी दूध उपलब्धता आहे तर दूध उत्पादनात देशांमध्ये उत्तर प्रदेश हे राज्य आघाडीवर आहे. अंडी उत्पादनाच्या संदर्भात देशाचा जगात तिसरा क्रमांक लागत असून देशात प्रतिव्यक्ती प्रतिवर्षी 90 एवढी अंडी उपलब्धता आहे तर एकूण अंडी उत्पादनात देशांमध्ये आंध्र प्रदेश हे राज्य प्रथम क्रमांकावर आहे. जगातील एकूण मांस उत्पादनात देशाचा आठवा क्रमांक लागत असून देशामध्ये प्रतिव्यक्ती मांस उपलब्धता 6.52 किलोग्रॅम एवढी आहे. तर देशातील एकूण मांस उत्पादनात महाराष्ट्र राज्य हे प्रथम क्रमांकावर आहे. देशातील एकूण लोकर उत्पादनाच्या संदर्भात राजस्थान या राज्यांमध्ये सर्वाधिक लोकर उत्पादन होते.

**अभ्यास विषयाची उद्दिष्टे :**

1. महाराष्ट्र राज्यातील व देशातील पशुधन माहीत करून घेणे
2. महाराष्ट्र राज्यात पशुधनापासून मिळणारे उत्पादन समजून घेणे
3. देशातील व महाराष्ट्रातील पशुधन व त्यापासून मिळणारे उत्पादन यांचा तुलनात्मक अभ्यास करणे

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधात दुय्यम स्त्रोताचा आधार घेण्यात आला असून विविध पुस्तके संदर्भ ग्रंथ संशोधन पत्रिका वर्तमानपत्रे व इंटरनेट वेबसाइट्स इत्यादीचा संशोधन स्त्रोत म्हणून आधार घेण्यात आलेला आहे.

**देशातील व महाराष्ट्र राज्यातील पशुधन:**

भारतातील पशुपालन हा व्यवसाय उदरनिर्वाहाचा पारंपारिक व्यवसाय असून शेतीच्या अर्थशास्त्राशी निगडित आहे. देशातील पशुधन किंवा पशुपालनामध्ये गाय व बैल, म्हशी व रेडे, शेळ्या व मेंढ्या तसेच इतर पशुधनांमध्ये डुकरे, घोडे, शिंगरे, खेचरे, उंट व गाढव इत्यादींचा समावेश होतो. पशुगणना 2019 नुसार देशातील निवडक राज्यांमधील पशुधन खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

तक्ता क्रमांक 1 - **पशु गणना 2019 नुसार निवडक राज्यांमधील पशुधन**

| **राज्य** | **पशुधन (आकडे हजारात)** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **गाई व बैल** | **म्हशी व रेडे** | **शेळ्या व मेंढ्या** | **इतर** | **एकूण** |
| आंध्र प्रदेश | 4601 (2.38) | 6219 (5.66) | 23149 (10.37) | 99 (0.96) | 34068 (6.35) |
| गुजरात | 9634 (4.98) | 10543 (9.60) | 6655 (2.98) | 61 (0.59) | 26893 (5.01) |
| कर्नाटक | 8469 (4.38) | 2985 (2.72) | 17220 (7.72) | 339 (3.29) | 29013 (5.41) |
| मध्य प्रदेश | 18751 (9.69) | 10307 (9.38) | 11389 (5.10) | 190 (1.84) | 40637 (7.57) |
| महाराष्ट्र | 13993 (7.23) | 5604 (5.10) | 13285 (5.95) | 198 (1.92) | 33080 (6.16) |
| राजस्थान | 13938 (7.20) | 13693 (12.46) | 28744 (12.88) | 426 (4.14) | 56801 (10.58) |
| तामिळनाडू | 9519 (4.92) | 519 (0.47) | 14389 (6.45) | 74 (0.72) | 24501 (4.56) |
| तेलंगणा | 4232 (2.19) | 4226 (3.85) | 23998 (10.75) | 185 (1.80) | 32641 (6.08) |
| उत्तर प्रदेश | 19020 (9.83) | 33017 (30.06) | 15465 (6.93) | 511 (4.96) | 68013 (12.67) |
| उर्वरीत राज्य | 91306 (47.20) | 22739 (20.70) | 68852 (30.86) | 8217 (79.78) | 191114 (35.61) |
| **देशातील एकूण पशुधन** | **193463 (100.00)** | **109852 (100.00)** | **223146 (100.00)** | **10300 (100.00)** | **536761 (100.00)** |

स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2021 -22

टिप: कंसातील संख्या देशातील एकूण पशुधनाशी प्रमाण टक्केवारी मध्ये दर्शवितात

तक्ता क्रमांक 1 मध्ये पशुगणना 2019 नुसार निवडक राज्यांमधील पशुधनाची संख्या हजारात दर्शविलेली आहे पशुगणना 2019 नुसार देशांमध्ये एकूण 193463 हजार एवढी गाय व बैलांची संख्या होती त्यापैकी सर्वाधिक 9.83 टक्के एवढी उत्तरप्रदेश राज्यात होती तर त्यानंतर अनुक्रमे मध्यप्रदेश, महाराष्ट्र, व राजस्थान या राज्याचा दुसरा, तिसरा व चौथा क्रमांक लागतो. त्याचप्रमाणे देशातील एकूण म्हशी व रेड्यांच्या संख्येमध्ये उत्तर प्रदेश राज्य प्रथम क्रमांकावर असून त्यानंतर अनुक्रमे राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश इत्यादींचा क्रमांक लागतो. शेळ्या व मेंढ्याच्या संदर्भात देशातील एकूण शेळ्या व मेंढ्याच्या संख्येपैकी सर्वाधिक 12.88 % शेळ्या व मेंढ्या राजस्थान या राज्यात होत्या तर त्यानंतर अनुक्रमे तेलंगणा व आंध्रप्रदेश या राज्यात होत्या. इतर पशुधनाच्या संख्येमध्ये उत्तर प्रदेश या राज्यात सर्वाधिक प्रमाण दिसून येते. देशातील एकूण पशुधनाच्या संदर्भात विचार केला असता देशातील एकूण पशुधनांपैकी सुमारे 12.67% पशुधन एकट्या उत्तरप्रदेश या राज्यात आहे तर त्यानंतर अनुक्रमे राजस्थान या राज्यात 10.58% एवढे तर मध्य प्रदेश राज्यात 7.57% एवढे पशुधन असल्याचे दिसून येते.

तक्ता क्रमांक 2

**पशुधन गणना वर्ष निहाय महाराष्ट्र राज्यातील पशुधन**

| पशुधन गणना वर्ष | पशुधन (आकडे हजारात) | | | | | दर एक लाख लोकसंख्ये मागे पशुधन |
|---|---|---|---|---|---|---|
| | गाई व बैल | म्हशी व रेडे | शेळ्या व मेंढ्या | इतर | एकूण पशुधन | |
| 1961 | 15328 | 3087 | 7273 | 360 | 26048 | 66 |
| 1966 | 14729 | 3042 | 7326 | 352 | 25449 | 57 |
| 1972 | 14705 | 3301 | 8038 | 317 | 26361 | 52 |
| 1978 | 15218 | 3899 | 10199 | 326 | 29642 | 51 |
| 1982 | 16162 | 3972 | 10376 | 409 | 30919 | 48 |
| 1987 | 16983 | 4755 | 12068 | 449 | 34255 | 48 |
| 1992 | 17441 | 5447 | 13016 | 489 | 36393 | 46 |
| 1997 | 18071 | 6073 | 14802 | 692 | 39638 | 50 |
| 2003 | 16738 | 6084 | 13624 | 612 | 37058 | 36 |
| 2007 | 16184 | 6073 | 13301 | 397 | 35955 | 37 |
| 2012 | 15484 | 5595 | 11016 | 394 | 32489 | 29 |
| 2019 | 13993 | 5604 | 13285 | 198 | 33080 | 26 |

स्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2021 -22

तक्ता 2 मध्ये पशुधन गणना वर्षनिहाय महाराष्ट्र राज्यातील पशुधन दर्शवण्यात आलेले आहे. पशुधन गणना वर्ष 1961 मध्ये गाय व बैल यांची संख्या 15328 हजार एवढी होती पशुधन गणना वर्ष 2019 मध्ये त्यामध्ये (-8.71%) घट होऊन ती 13993 हजार एवढी राहिलेली आहे. म्हशी व रेडे आणि शेळ्या व मेंढ्या यांच्या संख्येमध्ये मात्र 1961 च्या तुलनेत 2019 मध्ये अनुक्रमे 81.54% व 82.66% एवढ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते, तसेच इतर पशुधन यामध्ये डुकरे, घोडे, शिंगरे, उंट व गाढव

इत्यादींचा समावेश होतो यांच्या संख्येमध्ये 1961 च्या तुलनेत 2019 मध्ये घट (-45.00%) झाल्याचे दर्शवित आहे. राज्यातील एकूण पशुधन व लोकसंख्या यांचा तुलनात्मक अभ्यास केला असता असे दिसून येते की पशुधन गणना वर्ष 1961 मध्ये राज्यांमधील दर एक लाख लोकसंख्येमागे 66 एवढे पशुधन होते त्यानंतर मात्र येणाऱ्या प्रत्येक पशुधनगणना वर्षामध्ये दर एक लाख लोकसंख्येमागे पशुधनाची संख्या घटत गेलेली असून पशुधनगणना वर्ष 2019 मध्ये ती दर एक लाख लोकसंख्येमागे फक्त 26 एवढीच राहिलेली दिसून येते याचाच अर्थ दरवर्षी पशुधनाच्या संख्येमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात घट झालेली दिसून येते.

**देशातील व महाराष्ट्र राज्यातील पशुधनापासून मिळणारे उत्पादन:**

देशातील ग्रामीण भागामध्ये शेती सोबतच शेळी व मेंढी पालन, गाय व म्हैस पालन व कुकुट पालन असे अनेक पशुपालन व्यवसाय केले जातात अशा पशुपालन व्यवसाय मधून शेतकऱ्यांना मांस, दूध, अंडी, लोकर इत्यादीचे उत्पादन होते. देशातील व राज्यातील पशुधनापासून मिळणारे उत्पादन पुढील तक्त्यात दर्शविण्यात आलेले आहे

तक्ता क्रमांक 3

**निवडक राज्यांमधील पशुधनापासून मिळणारे उत्पादन (2020-21)**

| **राज्य** | **मांस** (000 मे. टन) | **दूध** (000 मे. टन) | **अंडी** (कोटी) | **लोकर** (000 किलोग्रॅम) |
|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | 954 (10.84) | 14714 (7.01) | 2496 (20.45) | 0 (0.00) |
| गुजरात | 33 (0.38) | 15853 (7.55) | 193 (1.58) | 2004 (5.43) |
| कर्नाटक | 364 (4.14) | 10936 (5.21) | 762 (6.24) | 1052 (2.85) |
| मध्य प्रदेश | 116 (1.32) | 17999 (8.57) | 265 (2.17) | 431 (1.17) |
| महाराष्ट्र | 1109 (12.61) | 13703 (6.53) | 640 (5.24) | 1550 (4.20) |
| राजस्थान | 213 (2.42) | 30723 (14.63) | 280 (2.29) | 15676 (42.45) |
| तामिळनाडू | 669 (7.60) | 9790 (4.66) | 2012 (16.49) | 2 (0.01) |
| तेलंगणा | 920 (10.46) | 5765 (2.75) | 1585 (12.99) | 3366 (9.11) |
| उत्तर प्रदेश | 1038 (11.80) | 31359 (14.94) | 363 (2.97) | 886 (2.40) |
| उर्वरीत राज्य | 3382 (38.44) | 59118 (28.16) | 3609 (29.57) | 11964 (32.40) |
| **भारत** एकूण | **8798 (100.00)** | **209960 (100.00)** | **12205 (100.00)** | **36931 (100.00)** |

स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2021 -22

टिप: कंसातील संख्या देशातील एकूनाशी प्रमाण टक्केवारी मध्ये दर्शवितात

तक्ता 3 मध्ये 2020-21 मधील देशातील निवडक राज्यांमधील पशुधनापासून मिळणारे उत्पादन दर्शवण्यात आलेले आहे. देशातील एकूण मांस उत्पादनात महाराष्ट्र राज्याचा प्रथम क्रमांक लागत असून त्यानंतर अनुक्रमे उत्तरप्रदेश व आंध्रप्रदेश या राज्याचा दुसरा व तिसरा क्रमांक लागतो. देशातील एकूण दूध उत्पादनाच्या संदर्भात उत्तरप्रदेश राज्यात सर्वाधिक दूध उत्पादन होत असून त्यानंतर अनुक्रमे राजस्थान व मध्य प्रदेश या राज्याचा क्रमांक लागतो. देशामध्ये एकूण 12,205 कोटी अंडी उत्पादन होते त्यामध्ये सर्वाधिक 2496 कोटी (20.45%) अंडी उत्पादन आंध्रप्रदेश या राज्यात होते तर त्याखालोखाल तामिळनाडूमध्ये 2012 कोटी (16.49%) तर तेलंगणामध्ये 1585 कोटी (12.99%) अंडी उत्पादन होते. देशातील एकूण लोकर उत्पादनामध्ये राजस्थान हे राज्य आघाडीवर असून एकूण लोकर उत्पादनापैकी 42.45% लोकर उत्पादन एकट्या राजस्थान या राज्यात होते त्या खालोखाल तेलंगणा राज्यात 9.11% तर गुजरात मध्ये 5.43% एवढे लोकर उत्पादन झालेले दिसून येते

तक्ता क्रमांक 4

**देशात व महाराष्ट्रात पशुधनापासून मिळणारे उत्पादन**

| **वर्ष** | **मांस** (000 मे. टन) | | **दूध** (000 मे. टन) | | **अंडी** (लाख) | | **लोकर** (000 किलोग्रॅम) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| 2014-15 | 631 (9.43) | 6691 | 9542 (6.52) | 146314 | 50792 (6.47) | 784839 | 1386 (2.88) | 48140 |
| 2015-16 | 675 (9.62) | 7020 | 10153 (6.53) | 155491 | 52858 (6.37) | 829284 | 1390 (3.19) | 43581 |
| 2016-17 | 845 (11.44) | 7386 | 10402 (6.29) | 165404 | 54774 (6.21) | 881370 | 1407 (3.23) | 43544 |
| 2017-18 | 925 (12.08) | 7656 | 11102 (6.30) | 176347 | 56991 (5.99) | 952170 | 1437 (3.47) | 41463 |
| 2018-19 | 1021 (12.58) | 8114 | 11655 (6.21) | 187749 | 59649 (5.75) | 1038039 | 1457 (3.60) | 40420 |
| 2019-20 | 1140 (13.26) | 8600 | 12024 (6.06) | 198440 | 63713 (5.57) | 1143831 | 1412 (3.84) | 36763 |
| 2020-21 | 1109 (12.61) | 8798 | 13703 (6.53) | 209960 | 64028 (5.25) | 1220486 | 1550 (4.20) | 36931 |

स्त्रोत: Agricultural Statistics at a Glance- 2022

टिप: कंसातील संख्या देशातील एकूण उत्पादनाशी प्रमाण टक्केवारी मध्ये दर्शवितात

तक्ता 4 मध्ये वर्षनिहाय देशात व महाराष्ट्रात पशुधनापासून मिळणारे उत्पादन दर्शविण्यात आलेले आहे. देशातील एकूण मांस उत्पादनात महाराष्ट्र राज्याचे प्रमाण 2014-15 मध्ये 9.43% होते

त्यामध्ये वाढ होऊन ते 2020-21 मध्ये 12.61% एवढे झालेले दिसून येते. देशातील व महाराष्ट्र राज्यातील दूध उत्पादन 2014-15 पासून ते 2020-21 पर्यंत वाढलेले दिसत असले तरी देशातील एकूण दूध उत्पादनात महाराष्ट्र राज्याचे प्रमाण सहा ते साडेसहा टक्के यादरम्यान राहिलेले दिसून येते. महाराष्ट्र राज्यातील व देशातील अंडी उत्पादन 2014-15 च्या तुलनेत 2020-21 मध्ये वाढलेले दिसत असले तरी देशातील एकूण अंडी उत्पादनात महाराष्ट्र राज्याचे प्रमाण 2014-15 च्या तुलनेत 2020-21 मध्ये मात्र घटलेले दिसून येते. लोकर उत्पादनाच्या संदर्भात देशातील लोकर उत्पादन 2014-15 च्या तुलनेत 2020-21 मध्ये घटलेले दिसून येते तर या उलट महाराष्ट्र राज्यातील लोकर उत्पादनात मात्र वाढ झालेली दिसून येते तसेच देशातील एकूण लोकर उत्पादनात 2014-15 मध्ये महाराष्ट् राज्याचे प्रमाण फक्त 2.88% होते त्यामध्ये वाढ होऊन ते 2020-21 मध्ये 4.20% एवढे झालेले दिसून येते. थोडक्यात देशातील पशुधनापासून मिळणारे एकूण उत्पादनामध्ये 2014-15 च्या तुलनेत 2020-21 मध्ये मांस व लोकर उत्पादनात महाराष्ट्र राज्याचे प्रमाण देशाच्या तुलनेत वाढलेले दिसून येते तर दूध उत्पादनात मात्र देशाच्या तुलनेत स्थिर असलेले तर अंडी उत्पादनात मात्र महाराष्ट्र राज्याचे प्रमाण घटलेले दिसून येते.

**निष्कर्ष :**

भारतामध्ये पशुपालन हे शेतीच्या प्रमुख धंद्याला पूरक म्हणून वर्षानुवर्षे केले जात आहे. 2019 च्या पशुधन गणनेनुसार देशातील एकूण पशुधनांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत उत्तर प्रदेश राज्यात सर्वाधिक गाय व बैल पशुधन (9.83%) सर्वाधिक म्हैस व रेडे पशुधन (30.96%) व सर्वाधिक इतर पशुधन (4.96%) आहेत तर शेळ्या व मेंढ्याच्या संदर्भात देशातील इतर राज्याच्या तुलनेत (12.88%) राजस्थान या राज्यात सर्वाधिक शेळ्या व मेंढ्याचे प्रमाण दिसून येते. राज्यातील एकूण पशुधन व लोकसंख्या यांचा तुलनात्मक अभ्यास केला असता असे दिसून येते की पशुधन गणना वर्ष 1961 मध्ये राज्यांमधील दर एक लाख लोकसंख्येमागे 66 एवढे पशुधन होते त्यानंतर मात्र येणाऱ्या प्रत्येक पशुधनगणना वर्षामध्ये दर एक लाख लोकसंख्येमागे पशुधनाची संख्या घटत गेलेली असून पशुधनगणना वर्ष 2019 मध्ये ती दर एक लाख लोकसंख्येमागे फक्त 26 एवढीच राहिलेली दिसून येते. 2020-21 मधील देशातील एकूण मांस उत्पादनात महाराष्ट्र राज्याचा प्रथम क्रमांक लागत असून त्यानंतर अनुक्रमे उत्तरप्रदेश व आंध्रप्रदेश या राज्याचा दुसरा व तिसरा क्रमांक लागतो. देशातील एकूण दूध उत्पादनाच्या संदर्भात उत्तर प्रदेश राज्यात सर्वाधिक दूध उत्पादन होत असून दूध उत्पादनात महाराष्ट्र राज्याचा सहावा क्रमांक लागतो. राज्यामध्ये एकूण 12,205 कोटी अंडी उत्पादन होते त्यामध्ये सर्वाधिक 2496 कोटी (20.45%) अंडी उत्पादन आंध्र प्रदेश या राज्यात होते तर अंडी उत्पादनात महाराष्ट्र राज्याचा पाचवा क्रमांक लागतो. देशातील एकूण लोकर उत्पादनामध्ये राजस्थान हे राज्य आघाडीवर असून एकूण लोकर उत्पादनापैकी 42.45% लोकर उत्पादन एकट्या राजस्थान या राज्यात होते.

**संदर्भसूची:**

1. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2020- 21 अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.
2. पशुसंवर्धन सांख्यिकी पुस्तिका 2019- 20, पशुसंवर्धन आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे 411067 (सांख्यिकी शाखा)
3. Basic Animal Husbandry statistics 2021, Govt of India, Ministry of Fisheries, Animal Husbandry & Dairying, Krishi Bhavan, New Delhi.
4. Breed wise Report of Livestock & Poultry Based On 20th Livestock Census - 2019 Maharashtra State, Commissionerate of Animal Husbandry Pune.
5. Annual Report 2021-22, Ministry of Fisheries, Animal Husbandry & Dairying, Gov. of India.
6. Agricultural Statistics at a Glance- 2021, Ministry of Agriculture & Farmers Welfare, Department of Agriculture & Farmers Welfare, Economics & Statistics Division, Govt. of India.

-----------